**<u>नि.दिवाणी दावा क्रं.०३/२०२०</u>**
**<u>नि. क्रं.२९ लगत.</u>**

**<u>:: वादी पक्षातर्फे विधीज्ञ श्री. भोसले यांनी पुढील सरतपास घ्यायचे नाही असे सांगितल्याने सरतपास बंद.</u>**

**<u>:: प्रतिवादी करिता विधीज्ञ श्री. एस.बी. पाटील यांच्यामार्फत शपथेवर उलटतपास सुरु. ::</u>**

वादी हा माझा मावसभाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी हा जिल्हा परिषद शाळा मुकरमाबाद ता. मुखेड येथे नोकरीला होता आणि तेथेच राहत होता. मी खुंटूर ता. बिलोली जि. नांदेड येथे जिल्हा परिषद शाळेवर शिक्षक होतो. मी वर्ष २००३ मध्ये सेवानिवृत्त झालो. वादी केव्हा सेवानिवृत्त झाला हे मला माहीत नाही. वादीने प्लॉट क्र.१३ हा दि.१०/०५/१९८८ रोजी सदाशिव शिवलिंग पाटील यांच्याकडून विकत घेतला. त्याकरिता मुद्रांक १०० रुपयाचा घेतलेला होता. सदर बॉडचे साक्षीदार कोण होते आणि तो कोणी लिहिला होता हे माहिती नाही. मी सदर खरेदीपत्र बघितले होते. मी अलीकडच्या काळात सदर खरेदीखत बघितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्लॉट नं.१३ च्या उत्तरेस व्यंकट गोपाळराव बिरादारचे घर नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने सदर प्लॉट सदाशिवराव शिवलिंग पाटील यांच्याकडून खरेदी केल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्लॉटच्या दक्षिणेस सुरेश हणमंत पाटील असल्याचे खोटे कथन केले. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर प्लॉटच्या काल्पनिक चतु:सिमा सांगितल्या.

०२. हे मला माहीत नाही की, प्रतिवादी धोंडीबाने वर्ष २००३ मध्ये हणमंत सदाशिव बिरादार यांच्याकडून सदर प्लॉट घेतला. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्लॉट सर्वे नं.७३ मध्ये ४५ x ४० फूट क्षेत्रफळाचा आहे. सदर प्लॉटच्या पूर्वेस – रस्ता आणि पश्चिमेस – बोळ आहे. हे मला

माहीत नाही की, सदर प्लॉटच्या दक्षिणेस – रंगराव कारभारीचा प्लॉट आहे व उत्तरेस – नामदेव पाटील यांचा प्लॉट आहे. हे मला माहीत नाही की, धोंडीबाने सदर प्लॉट अकृषीक करून घेतला. हे मला माहीत नाही की, घर क्र.३५८ हा धोंडीबाच्या नावे झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, धोंडिबाने सदर प्लॉट वर स्नानगृह व शौचालय बांधले आणि तो त्यावर गुरे बांधतो. हे म्हणणे खरे नाही की, धोंडिबा हा वीस वर्षापासून सदर प्लॉटवर काबीज आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नोकरीवर असल्याने मला सदर प्लॉट बाबत मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीचा मावस भाऊ असल्याने खोटी साक्ष दिली आणि खोटे शपथपत्र दिले.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत                सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )                ( श.अ. सुरजुसे )

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.    दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

दि. ११/१२/२०२५.